# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी.सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email:- registrar@unigug.ac.in दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- establishment.section@unigug.ac.in

जा.क्र. गो.वि./आस्था./३९१८/२०२३ दि. ०७/१२/२०२३

## परिपत्रक

**विषय :- गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांच्या प्रशिक्षणाचे आयोजन करण्याकरीता विषयांची यादी सादर करण्याबाबत.**

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांत कार्यरत शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, विद्यापीठ कायद्यानुसारची कार्यप्रणाली, वित्तीय कामकाज, प्रशासकीय कामकाज, शैक्षणिक कामकाज, संगणकीय कामकाज इ. बाबतची बदलत्या काळानुसार अधिकची माहिती व्हावी. शासनाच्या कार्यालयीन कामकाजात पारंगत होऊन येणारी आव्हाने त्यांना अधिक चांगल्या रितीने पेलता यावीत. याकरीता महाविद्यालयातील शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता प्रशिक्षणाचे आयोजन करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे.

त्याअनुषंगाने सर्व संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांना कोण-कोणत्या विषयाची प्रशिक्षणे अपेक्षित आहेत. अशा विषयांची यादी सदर परिपत्रक निर्गमित झाल्यापासून पाच कार्यालयीन दिवसांच्या आत शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांनी महाविद्यालयनिहाय मा. प्राचार्य यांच्या शिफारशीने या कार्यालयास सादर करावी.

**मा. कुलगुरु महोदयांच्या मान्यतेने**

**(डॉ. अनिल हिरेखण)**
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी :-**

१. मा. कुलगुरु महोदयांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना कार्यवाहीकरीता अग्रेषित तसेच सदर परिपत्रक महाविद्यालयाच्या अधिनस्त असलेल्या शिक्षकेत्तर अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावे.
४. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
५. आस्थापना विभाग (नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**(डॉ. कामाजी देशमुख)**
उपकुलसचिव (प्र.)(आस्थापना)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली